# स्मार्टफोनवर ‘ई-दिवाळी’चा फराळ

## महाराष्ट्राबरोबरच परदेशातील वाचकांनाही मिळतेय ‘अक्षर मेजवानी’

**पुणे, ता. १० :** छापील पुस्तके वाचण्यात जी मजा आहे ती ई-ग्रंथांना नाही, असे म्हटले जाते; पण दिवाळी अंकांच्या बाबतीत हा निष्कर्ष खोटा ठरत चालला आहे. छापील दिवाळी अंकांबरोबरच ई-दिवाळी अंकांना सध्या उत्तम प्रतिसाद आहे. त्यामुळे प्रत्यक्ष अंक विकत घेऊन वाचणाऱ्या वाचकांबरोबरच ‘स्मार्टफोन’वर अंक ‘डाऊनलोड’ करून वाचणारे वाचक मोठ्या प्रमाणात दिसू लागले आहेत.

दिवाळी म्हटले, की आकाशकंदील, रांगोळी, नवे कपडे, फराळ याकडे लक्ष वेधले जाते. तसे ते दिवाळी अंकांकडेही वेधले जाते. त्यामुळेच बाजारात सध्या विविध विषयांना वाहिलेले तीनशेंहून अधिक अंक उपलब्ध झाले आहेत. यात दररोज नवनव्या अंकांची भरही पडत आहे. सुंदर मुखपृष्ठ, वाचनीय मजकूर, विषयांचे वैविध्य, चालू घडामोडींवर भाष्य अशा विविध कारणांमुळे अंकांना चांगला प्रतिसाद आहे. तसाच तो ई-दिवाळी अंकांनाही मिळत आहे.

### निर्मितीमूल्य कमी

**“छापील अंकांपेक्षा ई-दिवाळी अंकांची किंमत २५ ते ५० टक्क्यांपर्यंत कमी असते. कारण, ई-दिवाळी अंकांचे निर्मितीमूल्ये कमी असते. याबरोबरच कोणतेही ओझे सहन न करता एकावेळी अनेक अंक जवळ ठेवता येतात. ते हव्या त्या वेळी आणि हवे तेथे वाचता येऊ शकतात. सहज हाताळता येतात,” असे सुप्रिया लिमये यांनी सांगितले.**

‘बुकगंगा’च्या संचालक सुप्रिया लिमये म्हणाल्या, “सध्या दीडशेंहून अधिक अंक ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यापैकी ‘अनुभव’, ‘पुण्यभूषण’, ‘छंद’, ‘मिळून साऱ्याजणी’, ‘बिझनेस मंत्रा’, ‘कॉमेडी कट्टा’, ‘माहेर’, ‘मेनका’, ‘संवाद सृजनशिल मनाशी’, ‘तारांगण’ या आणि अन्य अंकांना प्रतिसाद मिळत आहे. मुले व महिलांच्या अंकांनाही चांगली मागणी आहे. ती केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे, तर अमेरिका, युरोप, सिंगापूर अशा वेगवेगळ्या ठिकाणच्या मराठी वाचकांमधून आहे.”

‘अक्षरधारा’चे रमेश राठीवडेकर म्हणाले, “ई-अंकांमुळे छापील दिवाळी अंकांची मागणी कमी होईल की काय, अशी भीती होती; पण छापील अंकांनाही तितकाच प्रतिसाद मिळत आहे. कारण, दिवाळी अंकांचा वाचक वाढत आहे. ‘सकाळ’चा ‘शब्ददीप’, ‘सकाळ साप्ताहिक’ या दिवाळी अंकांबरोबरच ‘मौज’, ‘अंतर्नाद’, ‘साधना’, ‘आवाज’, ‘जत्रा’ अशा वेगवेगळ्या अंकांना प्रतिसाद मिळत आहे. साहित्यविषयक अंकांची विचारपूस आणि प्रतिसाद पुन्हा एकदा वाढला आहे.”